**विशेष दिवाणी मुकदमा क्र.१०९/२०२३**
**निशाणी क्र.११८ लगत**

**<u>उलटतपास प्रतिवादी क्रं.१० व ११ तर्फे ॲड.जी. एस. भोसले</u> :**

६४. हे म्हणणे खरे आहे की नि.क्रं.१२४ वरील पान नं.१० व ११ वरील अंगठा कुणीही बांधलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की नि.क्रं.१२४ वरील पान नं.२ ते ८ वरील खरेदी करणाराचा अंगठा कोणाचा आहे याबाबत नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की सदर खरेदीखतावर नकुसाबाई हिचा फोटो नाही. हे म्हणणे खरे आहे की सदर खरेदीपत्रास नकुसाबाईचे कोणतेही ओळखपत्र जोडलेले नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की त्यावेळी ओळखपत्र जोडायची आवश्यकता नव्हती. हे म्हणणे खरे आहे की सदर खरेदीपत्रास नकुसाबाई हिचे बँकेचे पासबुक जोडलेले नाही.

६५. नि.क्रं.१२८ वरील संमत्तीपत्राचा स्टॅम्प मी अनिल नेवसे, स्टॅम्प व्हेंडर यांचेकडुन घेतला होता. हे म्हणणे खरे आहे की सदरचा स्टॅम्प कशाकरीता खरेदी केला हे त्यावर नमुद केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की सदर स्टॅम्पवर ओळख म्हणुन कोणी सही केली त्याचे नाव नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की संमत्ती देणार म्हणुन सदर स्टॅम्पवर जी नावे नमुद केली आहेत ती एका हस्ताक्षरात लिहलेली आहेत. हे मला सांगता येणार नाही की ती नावे कोणी लिहली व कुठे लिहली. हे म्हणणे खरे आहे की सदर स्टॅम्पमधील मजकुर कोणी लिहला व कुठे लिहला हे त्यामध्ये नमुद केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की सदर मजकुर कॉम्प्युटरमध्ये टाईप केला किंवा मशीनमध्ये टाईप केला हे त्यामध्ये नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की सदर संमत्तीपत्रामधील सहया मी केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की तथाकथीत सही करणार या लोकांचे इलेक्शन कार्ड, फोटो व बँकेचे पासबुक सदर संमत्तीपत्रास जोडलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की गट नं.१८१ ही मिळकत दावा दाखल करण्यापुर्वीच संपादीत झालेली होती. हे म्हणणे खरे नाही की त्याबाबत मी आजअखेर कुठेही तक्रार केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की मी योग्य त्या न्यायालयात त्याबाबत दाद मागितलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की प्रस्तुत दाव्यात संपादन करणाऱ्यांना पक्षकार म्हणुन सामील केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की माझी तक्रार घेतली नाही म्हणुन त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे मी तक्रार केल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की नि.क्रं.१२४ ते १२८ ही बोगस कागदपत्रे मी तयार केलेली आहेत.

हे म्हणणे खरे आहे की नि.क्रं.१२९ वरील अंगठयासमोर तो अंगठा कोणाचा आहे व तो कोणी बांधला आहे हे नमुद केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की नि.क्रं.१२९ वरील सुरुवातीपासुन शेवटपर्यंतचा मजकुर एकाच शाई व हस्ताक्षरात लिहलेला आहे. हे मला माहिती नाही की सुमन गणपत शिंदे यांना लिहता वाचता येत नव्हते. हे म्हणणे खरे आहे की सदर दस्तावर सुमन गणपत शिंदे यांची सही आहे हे दाखविणारा कागद दस्तासोबत जोडलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की सदर दस्तावर सुमन गणपत शिंदे यांची सही नाही. हे म्हणणे खरे नाही की सदर दस्तावर सुमन गणपत शिंदे हिने सही केली हे मी खोटे सांगत आहे.

६६. हे म्हणणे खरे आहे की सदर व्यवहार करण्याकरीता भरगुडे या व्यक्तीस मी अधिकार दिलेला आहे हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा मी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासातील परिच्छेद क्रं.१३ मधील 'सदर व्यवहाराबाबत माझे प्रतिनिधी श्री. भरगुडे यांना सदर रक्कम मिळाल्याची पावती लिहुन दिली आहे' हा मजकुर खोटा नमुद केला आहे. हे म्हणणे खरे आहे की भरगुडे हे आमच्या व्यवहारामध्ये मध्यस्थी होते ही बाब दाव्यात अथवा इतर कुठेही नमुद केलेली नसुन सदर बाब मी आजरोजी प्रथमत: सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की मी भरगुडे यांच्या नावावर पैसे वर्ग केले आहेत हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की भरगुडे यांच्याबाबत दाव्यातील व सरतपासातील कथन खोटे आहे. हे म्हणणे खरे आहे की गट नं.१९३ मध्ये मी सुधारणा केली व खर्च केला हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा मी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की गट नं.१९३ बाबत परवानगीसाठी मी अर्ज केला आहे व त्याकरीता खर्च केला आहे हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की र.रु.३,१७,४९९/- खर्च केला हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की सरतपासातील परिच्छेद क्रं.३८ मध्ये अ.नं.i ते vi या रकमांचा कागदोपत्री पुरावा मी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की सदर रकमा मी माझ्या मनाने खोटया लिहलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की गट नं.१९३ मध्ये माझी कब्जेवहिवाट आहे हे दाखविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा मी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की मी ७/१२ उतारा अथवा तहसिलदार यांच्याकडे वहिवाटदार म्हणुन नाव लावा यासाठी केलेला अर्ज दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की सदर मिळकतीतुन आलेले उत्पन्न मी विकले याबाबतच्या पावत्या दाखल केलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की

कब्जेपट्टीबाबत जो मजकुर नमुद केलेला आहे तो खोटा व बनावट आहे. हे म्हणणे खरे नाही की त्याठिकाणी माझा कब्जा आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की या व्यवहाराव्यतिरीक्त माझ्या अथवा माझ्या कुटूंबियांचे नावे कुठेही शेतजमीन नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की खेड तालुक्यात आमच्या नावे जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की असा दाखविणारा कागदोपत्री पुरावा आजपर्यंत मी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की माझे मुळ गाव खेड येथे माझी शेतजमीन आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की पैसे मिळविण्यासाठी मी हा बनावट दावा दाखल केलेला आहे. हे मला माहिती नाही की प्रतिवादी क्रं.१० याने सदर जमीन खरेदी घेण्याबाबत जाहीर नोटीस दिली होती. हे म्हणणे खरे आहे की त्याला मी उत्तर दिलेले नाही. हे मला सांगता येणार नाही की कोणाचेही उत्तर न आलेने त्यांनी साठेखत करुन घेतलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की सदर मिळकत खरेदी करण्याकरीता आवश्यक असणारी परवानगी प्रतिवादी क्रं.१० याने मिळविली. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादी क्रं.१० व ११ यांच्याबरोबर केलेल्या तथाकथीत साठेखताचा व्यवहार व प्रतिवादी क्रं.१२ याच्या लाभामध्ये करुन दिलेले साठेखत याबाबतची जाहीर नोटीस दैनिक प्रभात मध्ये दिली होती हा माझ्या सरतपासातील मजकुर बरोबर आहे. हे म्हणणे खरे नाही की नोटीस वाचुन देखील मी शपथेवर नोटीसबाबत माहिती नाही असे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की सदर नोटीसला मी उत्तर दिलेले नाही व त्याबाबतचा कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासातील संपुर्ण मजकुर खोटा व लबाडीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की माझा दावा मिळकतीशी काहीही संबंध नाही.

उलटतपास नाही. फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

स्थळ : वाई.
दिनांक : २९.०७.२०२५

(ए. ए. पाचरणे)
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, वाई.